# भारतीय ज्ञान प्रणाली आणि महिला सक्षमीकरण परंपरा ,परिवर्तन आणि आधुनिक संदर्भ

**सौ नम्रता भुरे**
श्री बिंझाणी सिटी कॉलेज (स्वायत्त ), उमरेड रोड, नागपूर

**सारांश :** हा शोध निबंध महिला सक्षमीकरणासाठी लागणाऱ्या प्रेरणादायी उपक्रमासाठी तयार करण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधात शैक्षणिक विश्लेषणात्मक व संशोधनात्मक उद्दिष्टे समोर ठेवून भारतीय ज्ञान परंपरेच्या प्रवाहात महिला सक्षमीकरणाचा सामाजिक व सौधांतिक अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.तसेच भारतीय ज्ञान परंपरा आणि महिला सक्षमीकरण यातील परस्पर संबंधांचा सामाजिक ,सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला आहे.

भारतीय ज्ञान परंपरेत महिलांचे स्थान महत्त्वाचे मानले गेले आहे. पूर्वी महिला शिक्षण ,तत्त्वज्ञान , धर्म आणि समाज जीवनात सक्रिय सहभागी होत्या.भारतीय ज्ञान व्यवस्थेत स्त्रीचे स्थान 'चूल आणि मूल ' एवढेच न राहता भौतिक ,सामाजिक आणि नैतिक जीवनाच्या केंद्रस्थानी होते.महिला सक्षमीकरण ही संकल्पना जागतिक पातळीवर चर्चा करताना भारतीय ज्ञान परंपरेतील स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा पुन्हा विचार करणे अत्यंत महत्त्वाचे ठरले.

सर्वप्रथम भारतीय ज्ञान परंपरा ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे **भारतीय ज्ञान परंपरा म्हणजे अनुभव चिंतन निरीक्षण आणि नैतिकतेवर आधारित संपूर्ण ज्ञान होय**.हे ज्ञान केवळ पुस्तकात नसून आजच्या व्यवहार लोकजीवन आणि परंपरांमध्ये रुजलेले आहेत.

भारतीय ज्ञान परंपरेची तुलना महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात वापरत असताना महिला सक्षमीकरणाचा अर्थही समजून घेणे आवश्यक ठरते.

**आर्थिक स्वावलंबनांसोबतच शैक्षणिक सामाजिक राजकीय आणि मानसिक सक्षमतेची प्रक्रिया म्हणजे महिला सक्षमीकरण होय.**

स्त्रीला केवळ पीडित म्हणून न पाहता ज्ञान वाहक आणि निर्मितीशील शक्ती म्हणून पाहण्याची दृष्टी भारतीय परंपरा देते. भारतीय संविधानाच्या संकल्पनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षण आणि स्त्री स्वातंत्र्यावर विशेष भर दिलेला दिसतो. स्त्री सक्षमीकरणाचा स्त्री शिक्षण हा कणा आहे.भारतीय ज्ञान परंपरेतील नैतिकता, सह ,अस्तित्व , करुणा ,समता या मूल्यांचा अंतर्भाव आधुनिक अभ्यासक्रमात झाल्यास स्त्रियांचा आत्मविश्वास वाढू शकतो. यातूनच उच्च शिक्षण , संशोधन ,तंत्रज्ञान आणि राजकीय नेतृत्वात स्त्रियांचा सहभाग वाढण्यास मदत होईल.

भारतीय ज्ञान परंपरा ही समाजाच्या नैतिक , सांस्कृतिक आणि सामाजिक संरचनेचा मुख्य आधार आहे असे मानले जाते. भारतीय ज्ञान परंपरा समाजाला जीवन जगण्याचा मार्ग शिकविते. या परंपरेत स्त्रिचे स्थान समाजाच्या विकासासाठी महत्त्वाचे मानले गेले आहे.भारतीय ज्ञान परंपरेत महिलांना बौद्धिक स्वातंत्र्य आणि समानतेचे स्थान होते कारण इतिहास आपणास सांगतो की वैदिक काळात गार्गी , मैत्रेयी यासारख्या विदुषी स्त्रियांनी मोठ्या - मोठ्या तत्व चिंतनामध्ये सक्रिय सहभाग घेतलेला आहे.

उत्तर वैदिक कालखंडात मात्र सामाजिक रचना अधिक पितृसत्ताक बनत केली. मध्ययुगीन कालखंडात तर धार्मिक रूढी सामाजिक निर्बंध आणि परंपरा वादी विचारसरणीमुळे स्त्रियांचे स्थान दुय्यम होत गेले. बालविवाह , सती प्रथा ,शिक्षणावर निर्बंध यासारख्या कुप्रथा स्त्रियांच्या जीवनात डोकावायला लागल्या आणि या कुप्रथा स्त्री सक्षमीकरणासाठी बाधित ठरू लागल्या. याच काळात संत परंपरेतील मीराबाई ,जनाबाई ,मुक्ताबाई यासारख्या संत कवींनी महिलांसाठी आवाज उठवण्याचा प्रयत्न केला गेला.

आधुनिक काळात भारतीय समाजात महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया वेगाने घडताना दिसते .शिक्षणाच्या प्रसार शहरीकरण , औद्योगिकीकरण , सामाजिक सुधारणा व संविधानातील मूल्यामुळे स्त्रियांच्या जीवनावर याचा चांगला परिणाम दिसून येतो आहे. भारतीय ज्ञान परंपरेतील समानतावादी मूल्यांचा उपयोग स्त्री सक्षमीकरणासाठी केला जात आहे .महिलांचे सक्षमीकरण सर्वांगीन म्हणजेच मानसिक ,सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरावर होणे अपेक्षित आहे.भारतीय संविधानाने महिलांना समानता , स्वातंत्र्य व सामाजिक न्यायाचे अधिकार दिले असून शिक्षण रोजगार व राजकीय सहभागातही महिलांना समान संधीचे वितरण करण्यात आले आहे.

भारतीय ज्ञान परंपरेतील मानवतावादी व समानतावादी मूल्यांचा समन्वय आधुनिक स्त्रीवादी विचारांशी साधल्यास महिला सक्षमीकरण अधिक प्रभावी होऊ शकते.भारतीय ज्ञान परंपरेतील समता ,सह अस्तित्व , मानव केंद्र मूल्ये आधुनिक काळात महिला सक्षमीकरणासाठी प्रेरित ठरू शकते. भारतीय ज्ञान आणि आधुनिक स्त्री सक्षमीकरण

यांचा समन्वय साधने हे केवळ समाजाची गरज नसून ती समताधिष्ठित आणि समृद्ध भारतीय समाज निर्माण करण्याची पायरी आहे. भारतीय ज्ञान परंपरेतील स्त्री विषयक सकारात्मक मूल्य नैतिक तत्वे आणि सामाजिक समतेची बीजे आधुनिक लोकशाही संविधानिक हक्क आणि स्त्रीवादी विचारांच्या प्रकाशात पुन्हा स्थापित केल्यास महिला सक्षमीकरण अधिक अर्थपूर्ण ठरू शकते. भारतीय ज्ञान आणि आधुनिकतेतील संवाद वाढल्यास महिलांचे स्वातंत्र्य ,सन्मान आणि समान सहभाग निश्चित करणारा समताधिष्ठित व सर्वसमावेशक भारतीय समाज घडविण्यात मोलाची मदत होऊ शकते.

या शोध निबंधात प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील स्त्रीच्या भूमिकेचे विश्लेषण करण्यात आले आहे या शोध निबंधात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करून भारतीय ज्ञान परंपरेचा समकालीन महिला सक्षमीकरणाशी असलेला संबंध स्पष्ट करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ये :**

१) भारतीय पितृसत्ताक व्यवस्था आणि सामाजिक रूढींचा महिला सक्षमीकरणावर झालेला परिणाम स्पष्ट करणे.
२)प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत महिलांच्या स्थितीत झालेले परिवर्तन अभ्यासणे.
३) भारतीय ज्ञानपरंपरेतील स्त्री विषयक संकल्पना आणि स्त्रीचे स्थान समजून घेणे.
४ ) भक्ती परंपरा व सामाजिक सुधारणा चळवळींनी महिला सक्षमीकरणात दिलेले योगदान समजून घेणे
५) भारतीय ज्ञान परंपरेतील समता माणुसकी आणि सहकार्याच्या मुलाचा आधुनिक महिला सक्षमीकरणाशी संबंध स्पष्ट करणे.
६ ) मला सक्षमीकरणासमोरील आजच्या सामाजिक व सांस्कृतिक अडचणी ओळखणे.
७) भारतीय ज्ञान परंपरेच्या आधारे महिला सक्षमीकरणासाठी उपयुक्त दिशा सुचवणे.
८ ) भारतीय ज्ञान परंपरेतील स्त्री विषयक संकल्पना आणि स्त्रीचे स्थान समजून घेणे.

**मुख्य शब्द (Keywords)** :
भारतीय ज्ञान परंपरा ,महिला सक्षमीकरण ,परंपरा व परिवर्तन ,स्त्रीवाद ,मानवतावाद ,समाजवाद ,सामाजिक समता , आधुनिक भारत ,सांस्कृतिक संदर्भ ,समताधिष्ठितता , लोकशाही ,सर्वसमावेशक सर्जनशीलता

**प्रस्तावना :-**

भारतीय समाज रचना ही प्राचीन समृद्ध आणि विविध ज्ञानपरंपरेवर आधारित आहे.

भारतीय ज्ञान परंपरा ही संपूर्ण जगभर प्रसिद्ध आहे. या ज्ञानपरंपरेत वेद ,उपनिषदेत ,स्मृती ग्रंथ , पुराणे बौद्धिक व जैन तत्वज्ञान ,संतपरंपरा तसेच लोकपरंपर येथील अनुभवावर आधारित ज्ञान यांचा समावेश होतो. याच ज्ञान परंपरेने भारतीय समाजाची सांस्कृतिक मूल्य व्यवस्था ,सामाजिक संस्था ,नैतिकता व मानवी संबंधाची चौकट घडविली आहे. या संदर्भात स्त्रीचे स्थान कौटुंबिक चौकटीत न राहता सामाजिक बौद्धिक आणि सांस्कृतिक स्तरावरही महत्त्वपूर्ण ठरलेले आहे. कुटुंबातील व समाजातील स्त्रीचे स्थान अभ्यासताना प्राचीन भारतातील स्त्री जीवनापासून आजच्या आधुनिक काळापर्यंतच्या महिलांच्या जीवनाचा विचार मला करावासा वाटतो प्राचीन काळातील स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण घेण्याचा व निरनिराळ्या क्रिया कौशल्य प्राविण्य प्राप्त करण्याचा अधिकार होता भगवान शंकराचे अर्धनारीनाटेश्वर रूप स्त्री-पुरुष समानता निर्विवादपणे व्यक्त करते.

**वेदकालीन स्त्री :** वैदिक काळात स्त्रियांना समाजात मानाचे स्थान होते सामाजिक जीवनात ही त्या सहभागी होताना दिसत. स्वयंभरात स्वयंवराद्वारा पती निवडीचे स्वातंत्र्य त्यांना होते त्यांना स्वतंत्र निर्णय घेण्याचे अधिकार होते उदाहरणार्थ सीता स्वच्छेने रामाबरोबर वनात गेली. त्यांना युद्धात सहभागी होणाचा अधिकार होता होते.उदा. दशरथाला कैकयीने युद्धात मदत केली. सामाजिक जीवनात बहुपत्नीत्वाची प्रथा अस्तित्वात होती. उदा.दशरथाला कौशल्या ,सुमित्रा , कैकयी इत्यादी राण्या होत्या.

**उत्तर वेदकालीन स्त्री :** या काळात स्त्रियांना अतिशय मानाचे स्थान होते त्यांना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे अधिकार होते नियोगपद्धतीद्वारा आपल्या अपत्याचा पिता कोण असावा हे ठरविण्याचा अधिकार होता उदाहरणार्थ कोणतीने युधिष्ठिर भीम अर्जुन यांचे पितृत्व नियोग पद्धती द्वारा वेगवेगळ्या पुरुषांकडून प्राप्त केलेले आहे यादव कुळातील स्त्रिया दुग्ध व्यवसायात प्रमुख भूमिका बजावताना दिसतात.

**बौद्ध व जैनकाली स्त्री :** या काळात स्त्रियांना ज्ञानप्राप्तीचे अधिकार होते भिक्षणी म्हणून त्या राहत असत त्यांना मानसन्मान प्राप्त होता.तत्कालीन स्त्रियांची स्थिती उत्तम होती कवयित्री म्हणून नावलौकिक मिळालेला सुमेदाने भिक्षणी होण्यासाठी आपल्या राज्याचा त्याग केला होता.अक्कादेवी अम्मा इयर मीराबाई यांना संपूर्ण देशाने विशिष्ट स्थान दिले होते तसेच सुप्रसिद्ध महिला दिली दासी शोभा याही भिक्षुली होत्या जैन धर्मात स्त्रीयांना मानाचे स्थान होते. यांच्यातही भद्दा , क्रांती यांनाही मानाचे स्थान होते.

**मनूचा काळ :** या काळाला धर्मशास्त्राचा काळ असे संबोधले जाते या काळात स्त्रियांबद्दलच्या स्थानात दोन टोकाच्या भूमिका दिसतात एका बाजूस स्त्रियांना मानसन्मान देणारी विचारसरणी आहे तर दुसऱ्या बाजूस स्त्रियांची हीन प्रतिमा समाजात निर्माण केली आहे.

**मौर्यकालीन स्त्री :** वैदिक काळातील स्त्री जीवनापेक्षा मौर्य काळातील चा दर्जा खालावलेला होता त्यांना कुटुंबात महत्त्वाचे स्थान नव्हते स्त्रियांची गुलाम म्हणून खरेदी विक्री चालत असे पती निघना नंतर सती जाण्याची प्रथा ही या काळात रूढ झाली. 'चूल व मूल ' हे क्षेत्र त्यांच्यासाठी निर्धारित करण्यात आले. स्त्रिया पुरुषांची हर प्रकारे सेवा करणाऱ्या दासी या काळातच बनल्याचे आढळते. परंतु याच काळात सम्राट अशोकांनी स्त्रियांसाठी अनेक चांगले कार्य केली आहे. चंद्रगुप्त मौर्य यांचा संरक्षणाची व्यवस्था शस्त्रधारी स्त्रियांच्या तुकडीकडे सोपविल्याचा उल्लेखही सापडतो. एकंदरीत दोन टोकावर स्त्रियांचे जीवन या काळात आढळते.

**मध्ययुगीन स्त्री :** ऐतिहासिक काळात युद्धजन्य स्थितीमुळे कोणत्याही स्त्रिया सुरक्षित नव्हत्या लढाई हरलेल्यांच्या स्त्रिया ह्या विजेत्यांकडून गुलामासारख्या वागवल्या जात असत युद्धाचा सोड उगवण्याचे त्या साधन बनत असत मुघल कालीन ही स्थिती आपल्या निदर्शनात येते शिवरायांच्या काळात राजकारण अर्थकारण समाजकारण या सर्व पातळ्यांवर सुयोग्य मार्गदर्शन करण्याचे काम जिजाऊंनी केले शिवरायमहिलांचा उचित आदर सन्मान टाकत असत हे कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेच्या उदाहरणात दिसते ते शूर धाडसी महिलांचा उचित गौरव करत हे हिरगणीच्या उदाहरणात उदाहरणात दिसते शिवरायांची सुनबाई ताराराणी ह्या गौरवशाली काम करताना दिसतात परंतु हे भाग्य सरसकट सर्व महिलांसाठी नव्हते युद्धचरणी स्थितीत महिलांना सुरक्षित ठेवण्याच्या नादात पडदा प्रथा , पाळण्यात लग्न लावणे , बालविवाह ,जरठकुमारी विवाह इत्यादी अनेक कुप्रथा शिवरायांच्या नंतर उदयास आल्या. भारतीय समाजात पितृ सत्य व्यवस्थेने प्रवेश केला सामाजिक रूढी परंपरावादी विचारसरणी आणि धार्मिक ग्रंथाच्या पुरुषप्रधान वास्तव्यामुळे महिलांच्या स्थान समाजात नियम झाले मध्ययुगीन काळात बालविवाह सती प्रथा विधवांचे केशव पण शिक्षणावरील निर्बंध यासारख्या खूप प्रकरणात महिलांच्या स्वातंत्र्यांवर मर्यादा घातल्या आणि तिच्या सार्वजनिक व बौद्धिक सहभाग त अघोषित बंधने निर्माण झाली.

**अंधार युग :**या काळात स्त्रियांची स्थिती पूर्वी कधीही नव्हती इतकी वाईट झाली. स्त्रियांना व्यक्ती म्हणून मान्यता असणे हे देखील आवश्यक वाटले नाही. ज्या पुरुषाशी तिचा विवाह झाला असेल त्याचे मत किंवा त्याचा शब्द हे स्त्रीसाठी अंतिम सत्य झाले. तिची मानसिकता इतकी दुर्बल करण्यात आली की दुःख ,कष्ट , अपमान सहन करण्यासाठीच तिचा जन्म झाला आहे हे तिच्यावर बिंबवण्यात आले.

**ब्रिटिश काळ :** 18 व्या शतकापासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतचा काळ हा ब्रिटिश का म्हणून ओळखला जातो या काळात स्त्रियांचा दर्जा हा पुरुषाच्या बरोबरीने कसा राहील यासाठी अनेक विध सुविधा निर्माण केल्या गेल्या. खऱ्या अर्थाने स्त्री जीवनाच्या विकासाला सुरुवात झाली.समाजाला देखील हळूहळू लक्षात आले की जर कुटुंबाच्या पर्यायाने समाजाचा विकास करावयाचा असेल त्या स्त्रियांच्या विकासाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सावित्रीबाई फुले सारख्या क्रांतीज्योतीने अनेक यातना सोसून समस्त भारतीय महिलांना शिक्षणाचे द्वार खुले केले .त्या काळात त्यांनी जोतिबाच्या मदतीने निरीक्षेतेचा उंबरठा पार केला म्हणूनच आज महिलांना त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाचे क्षमतांचे भान प्राप्त झालेले आहे.याच काळात शिक्षण विधवा विवाह सती प्रथा बंदी करण्यासाठी काही सुधारकांना चळवळी करण्या कराव्या लागल्या त्या सामाजिक सुधारकांपैकी राजा राम मोहन रॉय महात्मा फुले सावित्रीबाई फुले पंडिता रमाबाई यांनी विशेष योगदान दिले आहे. स्त्रीच्या अस्मितेसाठी परंपरेच्या विरोधात ठामपणे उभे राहिलेल्या महाराष्ट्रातल्या नव्हे तर भारतातल्या स्त्रियांमध्ये सर्वप्रथम नाव घेतले जाते पंडिता रमाबाई यांचे त्या काळात महाराष्ट्र बाहेरील ही नवजागृती स्त्रियांना आदर्श व मार्गदर्शन ठरलेल्या रमाबाईंना स्त्रीमुक्तीचे दुसरे रूप म्हटले जाते ब्रिटिशांची सत्ता सुरू झाल्यानंतर त्यांनी आणलेली नवीन राज्यपद्धती न्याय पद्धती भौतिक जीवन दृष्टी मिशन ज्यांनी स्थापन केलेली शिक्षण संस्था धर्मप्रसार यामुळे समाज जीवनात बरेच बदल होत गेलेले दिसून येतात या बदलाला समोरले जाताना पुरुषांच्या भिन्न भिन्न प्रतिक्रिया व्यक्त झालेल्या दिसतात पितृ सत्ता कुटुंब व्यवस्था व पुरुषप्रधान समाज व्यवस्था या दोन्ही स्त्रियांचे स्थान अतिशय नद्यांनी होते कुटुंबाचे संगोपन व पतीला सूज देणे याशिवाय तिला दुसरी भूमिका नव्हती. पंडिता रमाबाई या विचारातून स्त्री पुरुष समान हक्क व प्रतिष्ठा स्त्रीशक्ती स्त्री संघटन या आजच्या काळात दिसणाऱ्या संकल्पना शतकापूर्वी रमाबाईंनीनिर्भीडपणे मांडलेल्या दिसतात व्याख्यानातून प्रबोधनाचे मोठे कार्यकर्त्यांना पुरुषांमध्येही जागृती व्हावी या दृष्टीने त्यांनी निमंत्रण पत्रिकेत आपल्या घरची एखादी स्त्री बरोबर आणण्यात या पुरुषालाच व्याख्यानात प्रवेश दिला जाईल अशी अट घातलेली होती त्यांच्या भाषणामुळे पुण्याच्या सणातनी वातावरणात स्त्री मुक्ती विचार वाढीस लागल्यास मदत झाली.

**स्वातंत्र्योत्तर काळ :** ब्रिटिश काळात झालेला शिक्षणाचा प्रसार व प्रसारामुळे काही अंशी स्त्रिया शिक्षित होऊ लागल्या. संविधानामुळे स्त्री -पुरुष समानतेचा अधिकार प्राप्त झाला .मुलींच्या विवाहाचे वय वाढवण्यात आले.बालविवाह बंदी , सती जाण्यास बंदी , विधवा पुनर्विवाह प्रतिबंधक कायदा यामुळे समस्त स्त्रियांची विटंबना काही अंशी नियंत्रणात आली. आज 21 व्या शतकात असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे स्त्रियांनी आपले पाऊल ठेवले नाही .अगदी अवकाश यात्री ते स्कूबा डायव्हिंग पर्यंत सर्व कार्य ते समर्थने पार पाडते आहे**.**देशाला स्वातंत्र्य केल्यानंतर संविधानिक मूल्य स्त्री सक्षमीकरणासाठी शिक्षण रोजगार राजकीय सहभाग आणि कायदेशीर संरक्षण दोन समाजात एक स्थान मिळवून दिले.

प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेत स्त्रीला शक्ती , प्रवृत्ती आणि सर्जनशीलतेचे प्रतिक मानले आहे वैदिक काळात गार्गी मैत्रेयी लोपामुद्रा यासारख्या स्त्रिया तत्वचिंतन ,शास्त्रार्थ आणि बौद्धिक संवादात सहभागी होत्या. यावरून असे स्पष्ट होते की भारतीय ज्ञान परंपरेत महिलांना शिक्षण , विचार मंथन आणि सामाजिक सहभागात संधी होती.

भारतीय ज्ञान परंपरेतील परिवर्तनशील विचार संपुष्टात आले.भक्त चळवळीच्या माध्यमातून स्त्री संतांनी सामाजिक व धार्मिक बंधनात आव्हान दिले संत मीराबाई , संत जनाबाई , संत बहिणाबाई यासारख्या स्त्री संतांनी स्त्री अस्मिता आत्मस्वातंत्र्य आणि सामाजिक समतेचा संदेश दिला. यामुळे भारतीय ज्ञान परंपरेत असलेली समतेची बीजे पुन्हा अंकुरायला लागली.

महिला सक्षमीकरण म्हणजे प्रत्येक स्त्रीला स्वतःची ओळख करून देणे होय. समता ,कल्याण , स्वातंत्र्य ,समान हलक हक्क दारिद्र्य निर्मूलन या अर्थाने महिला सक्षमीकरण अपेक्षित आहे. महिलांमध्ये आत्मविश्वास स्वावलंबन आत्म भान व साह्य निर्माण करणे होय. हा महिला सक्षमीकरणाचा अंतिम उद्देश आहे. महिलांनी संघटित रित्या एकत्र येऊन त्यांच्यातील सुप्त गुण, अंगभूत क्षमता व कौशल्य यांचा विकास करून निर्णय घेणे व सर्व क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय.

राजकीय क्षेत्रात ग्रामीण स्तरापर्यंत महिला आरक्षणाने नेतृत्वाची नवेधारी उघडून दिली पंचायत राज्य व्यवस्थेतील सहभागामुळे स्थानिक पातळीवरील बहुतांश स्त्री प्रतिनिधींनी नेतृत्व करण्याची आपली लायकी सिद्ध केली आहे ग्रामीण महिलांच्या राजकारणातील सगळी सहभाग वाढल्यामुळे गावांमध्ये सरपंच म्हणून झेंडावंदन करणाऱ्या स्त्रिया ग्रामीण विकास कितपत होतो याकडे प्रत्यक्ष लक्ष देऊन कार्य करणाऱ्या महिलांची संख्या वाढली आहे आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणामुळे पंचायत समित्या पासून तर स्वायत्त संस्थेमधील सहभागापर्यंत महिलांचा सहभाग राज्यात वाढला आहे.

तरीही आधुनिक काळा स्त्री सक्षमीकरणासाठी अनेक सामाजिक , आर्थिक ,सांस्कृतिक आव्हाने आहेत. अजूनही महिलेवर कौटुंबिक हिंसा ,लैंगिक असमानता , आर्थिक असुरक्षितता आणि परंपरागत समाजाची मानसिकता यांचा महिलांच्या जीवनावर परिणाम होताना दिसत आहे .यासाठी फक्त कायदेशीर तरतुदी न करता भारतीय ज्ञान परंपरेतील समानतावादी , मानवतावादी आणि नैतिक मूल्यांचा आधुनिक संदर्भात पुनर्विचार करणे आवश्यक ठरते.

या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनात भारतीय ज्ञान आणि महिला सक्षमीकरण यांच्या परस्पर संबंध परंपरा परिवर्तन आणि आधुनिक पद्धतीने अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे .भारतीय ज्ञान परंपरेतील स्त्री विषयक संकल्पनांचा अभ्यास करणे व आधुनिक महिला सक्षमीकरणासाठी त्यांचे महत्त्व स्पष्ट करणे हा या अभ्यासाचा प्रमुख उद्देश आहे.

**चर्चा (Discussion) :**

**भारतीय ज्ञानपरंपरेतील स्त्री :**भारतीय ज्ञान परंपरेत स्त्रीला उपभोगाचे साधन न मानतात तिला नवनिर्मितीचे ,बौद्धिक तसेच आध्यात्मिक शक्तीचे प्रतीक मानले आहे. संदर्भात आदिशक्ती निसर्ग शक्ती आणि 'मातृदेवो भव' यासारख्या संकल्पनांचा वापर करून स्त्रीचे महत्त्व सांगण्यात आले आहे. वैदिक काळात चा विचार करता मैत्रेयी व काल्त्पयानी या याज्ञवल्क ऋषी यांच्या दोन बायका तसेच समकालीन बुद्धिवादी स्त्री गार्गी या तीन महिलांना अनुक्रमे ज्ञान , संपत्ती आणि बुद्धिवाद या स्त्रियांची तुलना करणे अपरिहार्य ठरते गार्गी मैत्रिणी लोकामुद्रा यासारख्या विदुषी स्त्रिया तत्त्वचिंतन शास्त्रार्थ आणि ज्ञान निर्मिती सक्रिय सहभागी होत्या यावरून भारतीय ज्ञान परंपरेत स्त्री-पुरुष क्षमतेची वैचारिक पद्धत अस्तित्वात होती असे दिसून येते.

**भारतीय समाजातील पितृसत्ताक व्यवस्था :** भारतीय समाजात पितृसत्ताक व्यवस्था वाढीला लागली.किती वाजता व्यवस्थेमुळे स्त्रीचे सामाजिक स्थान दुय्यम होत गेले स्त्रीला चूल व मूल या मर्यादेत ठेवण्यात आले.तिच्या शिक्षणावर निसर्ग क्षमता निर्णय क्षमता व सार्वजनिक सहभागावर मर्यादा येऊ लागल्या येऊ लागल्या यावरून स्त्रियांवर होणाऱ्या मर्यादा ह्या भारतीय ज्ञान परंपरेतल्या नसून त्या तिच्या सामाजिक वापरात आणि व्याख्येत आहे

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

आणि म्हणूनच महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने भारतीय ज्ञान परंपरेचा पुढचा अभ्यास व विचार करणे आवश्यक ठरते.

**परिवर्तनाचा नवा प्रवाह -भक्ती परंपरा :** स्त्री सबलीकरणासाठी भक्ती परंपरा महत्त्वाचा वाटा देतो. मीराबाई , जनाबाई ,मुक्ताबाई यासारख्या स्त्री संतांनी जात ,लिंग आणि सामाजिक बंधनांना आव्हान दिले. त्यांनी आपल्या अभंगातून स्वतंत्र , समता आणि मानवी प्रतिष्ठेचा विचार पुढे आणला. या परंपरेत स्त्रीचा आवाज केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक बंडखोरीचे प्रतीक ठरतो.त्यामुळे स्त्रीसंत परंपरेला म्हणजे भक्तीपरंपरेला महिला सक्षमीकरणाचा महत्त्वाचा वैचारिक घटक मानला जातो.

**समकालीन महिला सक्षमीकरण आणि भारतीय ज्ञान परंपरा :**भारतीय संविधानाने महिलांना समतेचे स्वातंत्र्याचे आणि सामाजिक न्यायाचे अधिकार दिले आहे केवळ कायद्यांनी महिला सक्षमीकरण होत नाही यासाठी सांस्कृतिक मानसिक बदला चा स्वीकार आणि मूल्य परिवर्तन आवश्यक आहे. भारतीय ज्ञान परंपरेतील समतावादी व मानवतावादी मूल्य आधुनिक महिला सक्षमीकरणासाठी पोषक ठरू शकतात आधुनिक काळात महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया शिक्षण कायदे व चळवळीच्या माध्यमातून वेगाने घडताना दिसते.

**महिला सक्षमीकरण व सद्यकालीन आव्हाने :**स्त्री स्वातंत्र्याचा विचार करता आजच्या काळात शिक्षण रोजगार आणि राजकीय सहभाग वाढला असला तरी महिलांना अजूनही लैंगिक समानता कौटुंबिक हिंसा आर्थिक असुरक्षितता आणि सांस्कृतिक रूढीचा सामना करावा लागत आहे. भारतीय ज्ञान परंपरेतील नैतिकता सह - अस्तित्व आणि समतेच्या मुल्यांचा उपयोग करून या आव्हानांना समोरी जाते येऊ शकेल.

**भारतीय ज्ञान परंपरा महिला सक्षमीकरणाचा पाया :**महिला सक्षमीकरणासाठी भारतीय ज्ञान परंपरेचा मुलाचा आधार मिळू शकतो विज्ञान परंपरेतील सकारात्मक विचारांच्या बळावर आधुनिक समाजात महिलांचे स्वातंत्र्य सन्मान आणि समाज सहभाग सोनी निश्चित करता येऊ शकते त्यामुळे केवळ महिला सक्षमीकरण न होता सामाजिक सुधारणा व व्यापक सामाजिक परिवर्तन होण्यास कारणीभूत ठरू शकेल.

**पाश्चात्य स्त्रीवाद आणि भारतीय स्त्रीवाद यांची तुलना :**भारतीय संदर्भात महिला सक्षमीकरण हे कुटुंब समाज आणि सांस्कृतिक नातेसंबंधाशी जोडलेले आहे भारतीय ज्ञान परंपरेतील स्त्रीवादी संकल्पना आधुनिक स्त्रीवादाशी जोडण्यात , परिवर्तनाची दिशा निश्चित होण्यास , योग्य परिवर्तन होण्यास सहाय्य ठरू शकेल.

थोडक्यात भारतीय ज्ञान आणि महिला सक्षमीकरण यांचा संबंध हा परंपरा आणि परिवर्तन यांच्या परस्पर संबंधातून विकसित झालेला आहे भारतीय ज्ञान परंपरा ही आधुनिक महिला सक्षमीकरणासाठी केवळ सांस्कृतिक वारसा नसून प्रभावी वैचारिक प्रतिष्ठान ठरते.

**निष्कर्ष :**

या अभ्यासातून असे स्पष्ट होते की भारतीय ज्ञान परंपरा आणि महिला सक्षमीकरण यांचा खूप जवळचा संबंध आहे भारतीय संस्कृतीत स्त्रीला महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे तिला शक्ती ,सर्जनशील मानले गेले असून ती कुटुंब आणि समाजाचा आधार आहे जुन्या काळात गार्गी मैत्रेयी यासारख्या स्त्रिया शिकलेल्या होत्या आणि विचार मंथन करत होत्या यावरून असे दिसते की पूर्वी महिलांना शिकण्याची आणि बोलण्याची म्हणजेच व्यक्त होण्याची मुभा होती पण अजून त्यापुढील काळात समाजात काही चुकीच्या कुप्रथा सुरू झाल्या स्त्रीचे शिक्षण नाकारले गेले बालविवाह आणि त्यांना घरगुती कामापुरते मर्यादित ठेवले गेले त्यामुळे महिलांचे स्वातंत्र्य कमी झाले हे सगळे भारतीय ज्ञान परंपरेमुळे झाले असे नाही तर समाजातील चुकीच्या विचारांमुळे झाले आहे.

भक्तीपरंपरेतील स्त्री संतांनी या न्याय विरुद्ध आवाज उठवला मीराबाई जनाबाई मुक्ताबाई यांनी आपल्या रचनांमधून स्त्री समानतेचा पुरस्कार केला पुढे सावित्रीबाई फुले पंडिता रमाबाई यासारख्या समाजसुधारकांनी मुलीच्या शिकण्यासाठी खूप काम केले त्यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला स्वातंत्र्यानंतर संविधानाने महिलांना शिक्षण नोकरी मतदान आणि समानतेचे हक्क दिले त्यामुळे महिला अनेक देशात पुढे आहे त्या शिक्षित डॉक्टर अधिकारी लोकप्रतिनिधी म्हणून काम करत आहे तरीही आजही काही महिलांना अडचणी येतात घरगुती हिंसा आर्थिक अवलंबित्व आणि जुन्या रूढी अजूनही काही ठिकाणी दिसतात.

म्हणून महिलांना फक्त कायदे देऊन सशक्त करता येत नाही समाजाची विचारसरणी बदलणे खूप गरजेचे आहे महिलांना आदर देणे त्यांना शिकण्याची संधी देणे त्यांचे निर्णय मान्य करणे आवश्यक आहे

भारतीय ज्ञान परंपरेतील माणुसकी समता आणि सहकार्याची मूल्ये आज पुन्हा समजून घेण्याची गरज आहे.कारण महिला सक्षमीकरण झाले तर कुटुंब मजबूत होते ,समाज सुधारतो आणि देश पुढे जातो. महिलांना समान संधी आणि समान सन्मान मिळाल्यास भारताचा विकास अधिक वेगाने होईल हाच या अभ्यासाचा निष्कर्ष आहे. महिलांना योग्य संधी , आदर आणि स्वातंत्र्य मिळाल्यास भारत अधिक सक्षम आणि उज्वल भविष्याकडे

जाईल .यासाठी भारतीय ज्ञान परंपरेतील माणुसकी , समानता आणि सहकार्याचे मूल्य आज पुन्हा एकदा वापरण्याची गरज निर्माण झाली आहे .

**संदर्भ ग्रंथ :**

* देसाई , संभाजी , महिला सबलीकरण : प्रशांत पब्लिकेशन - २०१४
* भालेराव , सुरेश , लोणारकर प्रवीण - मानवी हक्क : सद्यस्थिती आणि आव्हाने ,प्रशांत पब्लिकेशन ,२०१३
* भारत सरकार - भारतीय संविधान. भारत सरकार प्रकाशन विभाग २०१९
* देशमुख , सुजाता , स्त्री अभ्यास : संकल्पना आणि संदर्भ , डायमंड पब्लिकेशन २०१५
* देशपांडे ,निरा -भारतीय समाजातील स्त्री , नॅशनल बुक ट्रस्ट , २०१२
* पाटील ,शांता - महिला सक्षमीकरण सिद्धांत आणि व्यवहार , शिवाजी विद्यापीठ प्रकाशन 2017
* श्रीवास्तव, अर्पित - India Knowledge System, 2024
* नायर, शांता एन, Ethics of ancient Indian wisdom the universal Hindu vision and its Edifice
* गोरे विविध भारतीय ज्ञान परंपरा उज्वल भविष्यासाठी भूतकाळाची जाणीव. Pothi. com ( ई -बुक)
* श्रीवास्तव ,अर्पित -भारतीय ज्ञान प्रणाली, प्रशांत पब्लिकेशन, जून २०२४
* सेतुरमन पी. Ancient Indian wisdom: spiritual Heritage- website
* रानडे ,रमाबाई - आमच्या आयुष्यातील काही आठवणी
* पवार, दिपक - महिलांचे राजकीय सक्षमीकरण
* पारधी , आर. एन. -भारतीय स्त्री
* आठवलेकर मंगल , महर्षी ते गौरी
* जाधव , रा. ग. - आधुनिक मराठी कवयित्रीची कविता